जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ३७४ दिनांक - १९/०५/२०२३

### भारती विद्यापीठ पोलिस स्टेशन पुणे शहर

### कंपनीतील कामगारांनी मालकाची दिनक्रमाची माहीती घेवुन,गुन्हेगार साथीदारांसह ५० लाख रुपयांची खंडणी मागणा-यांना अटक

दिनांक ०६/०५/२०२३ रोजी रात्रौ ०८.०० वा चे सुमारास कात्रज हायवे वरील आर्यन स्कुलजवळ मोबाईल धारक इसम व त्याचे पाच,सहा मित्रांनी मिळुन फिर्यादी यांचेकडुन ५० लाख रुपयाची खंडणी उकळण्याचे उद्देशाने फिर्यादी यांची कार आडवुन त्यांना गाडीतुन खाली उतरुन त्यामधील एका इसमाने फिर्यादी यांना चाकुचा धाक दाखवुन बाकीच्यांनी फिर्यादी यांना मारहाण करुन शिवीगाळ केली व जाताना त्यातील एकाने “लक्षात ठेव” अशी धमकी दिली. तसेच दिनांक १२/०५/२०२३ रोजी दुपारी ०२.१५ वा मोबाईल धारक इसमाने फिर्यादी यांना वॉटसअप कॉल करुन त्यांना ५० लाख रुपयांची खंडणी मागुन, खंडणी नाही दिली तर फिर्यादी व त्यांचे कुंटुबास जीवे मारण्याची धमकी दिली आहे.म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार **हर्षल शिंदे,सचिन गाडे, धनाजी धोत्रे** यांचे बातमीदाराचे मार्फतीने आरोपी निष्पन्न करुन त्यामध्ये आरोपी **१.सौरभ संजय बनसोडे,वय २१ वर्षे,रा.शिवाजी चौक,रामगनर,वारजे,पुणे २.पवन मधुकर कांबळे, वय २२ वर्षे, रा.धायरी,पुणे ३.संकेत योगेश जाधव, वय २४ वर्षे,रा.आनंद सुपर मार्केट मागे,न-हे, पुणे ४.कृष्णा भिमराव भाबट,वय १९ वर्षे,रा.दुर्गांकुर कॉम्पलेक्स, धायरी,पुणे** यांना अटक केली आहे.

### आरोपींनी असा रचला मालकाकडुन खंडणी मागण्याचा कट

आरोपी क्रमांक १ ते ३ हे फिर्यादी यांचे कंपनीत कामास असताना,त्यांनी फिर्यादी यांचेकडे किती रक्कम आहे,फिर्यादी हे ऑफिसला कोणत्या गाडीत कधी येतात,कधी जातात,कोणत्या मार्गाने जातात याची माहीती घेतली. त्यानंतर आरोपी व त्यांचे साथीदारांनी मिळुन फिर्यादी यांना धमकावुन खंडणी देण्यास प्रवृत्त व्हावे या करता त्यांनी कट रचुन दिनांक ०६/०५/२०२३ रोजी फिर्यादी यांचा कंपनीपासुन पाठलाग करुन कात्रज हायवेवर त्यांची गाडी आडवुन फिर्यादी हे घाबरुन खंडणी देतील या उद्देशाने फिर्यादी यांना चाकुचा धाक दाखवुन धमकाविले होते. त्यानंतर आरोपीतांनी फिर्यादी दिनांक १२/०५/२०२३ रोजी यांना वॉटसअप कॉलद्वारे फोन करुन ५० लाख रुपयांची खंडणी मागितली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विजय कुंभार,पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय पुराणिक,सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ,पोलीस उप निरीक्षक धिरज गुप्ता,पोलीस अंमलदार हर्षल शिंदे,सचिन गाडे,धनाजी धोत्रे, सचिन सरपाले,शैलेश साठे,चेतन गोरे,निलेश ढमढेरे,मंगेश पवार,अवधुत जमदाडे,अभिनय चौधरी,निलेश खैरमोडे, राहुल तांबे,विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.